स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मानव्यविद्या शाखेंतर्गत मराठी विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी संपादनाकरिता
सादर करावयाच्या संकल्पित प्रबंधाची रूपरेषा

शीर्षक

देवदासींचे चित्रण करणाऱ्या कथात्मक साहित्याचा समाजभाषावैज्ञानिकदृष्टीने अभ्यास

संशोधक

श्री. सौरभ रमेश पाटणकर

मु.पो. : यड्राव, तालुका : शिरोळ,

जिल्हा : कोल्हापूर

मो.नं. ७३८७३७७८८७

मार्गदर्शक

प्रा. डॉ. राजीव वैजनाथराव यशवंते

सहा. प्राध्यापक

मराठी विभागप्रमुख,

श्री. गुरुबुद्धी स्वामी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पूर्णा.

मो.नं. ७५८८९९५५५३

संशोधन केंद्र

भाषा, साहित्य व संस्कृती अभ्यास संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

जुलै, २०१९

देवदासींचे चित्रण करणाऱ्या कथात्मक साहित्याचा समाजभाषावैज्ञानिकदृष्टीने अभ्यास

प्रस्तावना :

मानव आपले विचार व भावना भाषेतून व्यक्त करतो. संप्रेषण व्यवहारासाठी भाषा हे अत्यंत महत्वाचे साधन आहे. मानवाने निर्माण केलेल्या 'भाषा' या शक्तीमुळे मानवाचे इतर प्राण्याहून वेगळेपण निश्चित होते. भाषेचा विकास मानवाने केला तर आजचे विकसित मानवी रूप भाषेमुळे शक्य झाले आहे. भाषेशिवाय मानवी प्रगतीची कल्पनाही करता येणार नाही.

जगभरात हजारो भाषा बोलल्या जातात. भाषेच्या माध्यमातून समाजाची निर्मिती होते. प्रत्येक समाजाला एक वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती असते. संस्कृतीच्या चलन-वलनात व संक्रमणात भाषा महत्त्वाची भूमिका पार पाडते. मानवी समाजाच्या व संस्कृतीच्या अभ्यासासाठी मानववंशशास्त्रज्ञांनी, समाजशास्त्रज्ञांनी सर्वप्रथम भाषेचा अभ्यास सुरू केला. मानववंशविज्ञान, समाजशास्त्र, इतिहास यांच्या अभ्यासासाठी पूरक म्हणून भाषेचा अभ्यास सुरू झाला व नंतर एक स्वतंत्र शास्त्र म्हणून 'भाषाविज्ञान' आकारास येऊलागले. भाषेची निर्मिती कशी झाली असावी पासून ते जगभरात वापरल्या जाणा-या विविध बोलींमधील, भाषांमधील साम्यभेदांवर चर्चा सुरू झाली.

19व्या शतकापर्यंत भाषेचा अभ्यास हा 'ऐतिहासिक' व 'तौलनिक पद्धती'ने करण्यात आला. विसाव्या शतकात मात्र 'फर्दिन द सोस्यूर' या अभ्यासकाने ऐतिहासिक पद्धती बाजूला सारून 'वर्णनात्मक भाषाविज्ञानाचा' पाया घातला.भाषेचे 'परिवर्तनशीलता' हे स्वाभाविक वैशिष्ट्य गृहित धरून एका विशिष्ट कालखंडातील भाषा स्थिर मानून तिच्या व्यवस्थेचे वर्णन करणे, तिची संरचना समजून घेणे असे वर्णनात्मक भाषाविज्ञानाचे स्वरूप आहे. यानतंरचा महत्वाचा टप्पा म्हणून 'अमेरिकन संरचनावाद'चा उल्लेख करावा लागतो. स्वन, स्वनिम, रूपिम व वाक्य अशा चार पातळयांमधून या अभ्यासकांनी भाषेचा अभ्यास केला.मुखावाटे उच्चारले जाणारे व भाषेसाठी उपयुक्त असणारे ध्वनी, ध्वनींचा भाषासापेक्ष अभ्यास, स्वनिमांच्या वैशिष्ट्यपूर्ण रचनेतून तयार होणारे रूपिम व वाक्य यांची संरचना व कार्ये यांचा अभ्यास अमेरिकन संरचनावाद्यांनी केलेला आहे

अमेरिकन संरचनावाद्यांनी केलेल्या अभ्यासात 'अर्थविचाराला' स्वतंत्र स्थान नव्हते ती उणिव 'नोम चाम्स्की' या भाषा अभ्यासकाने भरून काढली व नंतरच्या काळात 'अर्थविचार' या घटकावर लक्ष केंद्रित केले. चाम्स्कीमुळे भाषाभ्यासात अर्थात्मक रचनांचा विचार सुरू

झाला. या सर्व अभ्यासातून भाषाविज्ञानाला काही नविन दिशा मिळाल्या व भाषाविज्ञानाच्या नविन शाखांचा विस्तार होवू लागला. यापैकी 1960 नंतर अस्तित्वात आलेली महत्त्वाची शाखा म्हणून समाजभाषाविनाज्ञाचा उल्लेख करावा लागेल.

समाजभाषावैज्ञानिकांच्यामते, 'सामाजिक संदर्भ वेगळे काढून भाषेचा विचार करता येणार नाही'. सामाजिक जडणघडणीतून निश्चित झालेले मानवी वर्तन आणि भाषावापर यांचा अभ्यास समाजभाषाविज्ञानात करण्यात येतो. याबरोबरच भाषिक समाजाचे विशेष, भाषिक समाजाचा भाषाव्यवहार, भाषिक समाजांतर्गत येणारी अनेक भाषाजाळी, परस्पर संपर्कासाठी वापरली जाणारी भाषा, व्यक्तीविशिष्ठ भाषाव्यवहार म्हणजेच व्यक्तीबोली, सामाजिक बोली, भाषेच्या भौगोलिक सीमा, परभाषासंपर्कामुळे भाषेवर झालेला परिणाम, परभाषेतून झालेली उसनवारी, बहुभाषिकता, द्विभाषिकता, वाचापालट, वाचा सरमिसळ इ. चा अभ्यास समाजभाषाविज्ञानात करण्यात येतो. भाषावापराचे सामाजिक नियम,दंडक, विशिष्ठ स्थळ, ठिकाण व परिस्थितीत वापरल्या जाणा-या भाषिक रूपामागील सामाजिक कारणे यांचाही अभ्यास समाजभाषाविज्ञानात करण्यात येतो.

अभ्यासविषय निवडण्यामागील भूमिका

समाजभाषाविज्ञानात व्यक्तीच्या तसेच भाषिक समाजाच्या भाषावापरशैलीचा अभ्यास करण्यात येतो. भाषिक समाजाच्या भाषावापरशैलीचे निर्धारण करणा-या सामाजिक कारणांचा अभ्यासही समाजभाषाविज्ञानात अभिप्रेत असतो. असा अभ्यास करण्यासाठी संशोधक दोन मार्गांचा अवलंब करतात. प्रत्यक्ष भाषिक समाजात जावून भाषिकांचे भाषावापराचे नमुने संग्रहित करणे व त्यांचे विश्लेषण करणे किंवा लिखित साहित्यातील समाजजीवनाचे चित्रण करताना उपलब्ध झालेल्या भाषिक समाजाच्या भाषावापराचे विश्लेषण करणे.

कथात्मक साहित्याचे रूपविशेष व उपलब्ध भाषिक अवकाशामुळे समाजजीवनाचे व्यापक व विस्तृत चित्रण करण्यासाठी कथात्मक साहित्य हा अत्यंत उपयुक्त वाङमय प्रकार आहे. प्रारंभापासूनच मराठी कथात्मक साहित्यात समाजजीवनाचे व्यापक चित्रण करण्यात आले आहे, असे असले तरी ज्या समाजाच्या मुशीतून साहित्य प्रकट होते त्या समाजाची भाषा मात्र 1960 नंतर साहित्य व्यवहारात प्राधान्याने दिसू लागली. 1960 नंतर अस्तित्वात आलेल्या ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, प्रादेशिक साहित्य, आदिवासी साहित्य इ. वाङमय प्रवाहातून लेखन करणा-या लेखकांनी समाजजीवनाचे चित्रण करताना प्रामुख्याने त्या-त्या समाजाची भाषा साहित्यामध्ये वापरण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. ग्रामीण साहित्यातील

व्यंकटेश माडगूळकरांसारख्या लेखकांनी निवेदनासाठी प्रमाणभाषा तर संवादासाठी ग्रामीण भाषा अथवा स्थानिक बोलींचा वापर केलेला आहे तर रा.र.बोराडे यांनी निवेदन व संवाद या दोन्हीसाठी ग्रामीण भाषेचा वापर केलेला आहे. दलित साहित्य व आदिवासी साहित्यात या दोन्ही प्रवत्ती ठळकपणे दिसून येतात. या सर्व लेखनामुळे वेगवेगळया प्रदेशाच्या व या प्रदेशात राहणा-या वेगवेगळया समाजाच्या बोलींचे भाषेचे विपुल भाषाभंडार अभ्यासासाठी अभ्यासकांना उपलब्ध झालेले आहे.

साठोत्तरी साहित्यप्रवाहातून वेग-वेगळे प्रदेश, त्या प्रदेशातील निरनिराळया जाती यांचे चित्रण जसे केलेले आहे. तसेच विविध सामाजिक वर्गांचे चित्रणही आलेले आहे. त्यापैकी एक महात्वाचा वर्ग म्हणून 'देवदासी' चा उल्लेख करावा लागेल. मराठी साहित्यात सुमारे 25 कादंबरीत व साधारणत: 30 कथांमधून देवदासींचे चित्रण करण्यात आलेले आहे. या कथा-कादंबरीतून समाजजीवनाचे चित्रण करताना बहुतांश लेखकांनी त्यत्या भागातील बोलीभाषेचा वापर केलेला आहे. कादंबरीकार राजन गवस यांनी जोगतीणीचे चित्रण गडहिंग्लज व गारगोटी या परिसराच्या पार्श्वभूमीवर केलेले आहे. त्यामुळे त्यांच्या 'चौंडक', 'भंडारभोग' या कादंबरीत त्या परिसरातील भाषा आलेली आहे. महादेव मोरे यांनी आपल्या कादंबरीत 'वर आभाळ खाली धरती' व कथांमध्ये 'जोगतीण', 'श्वापद', 'काळोखातील खुणा', 'बेंडल', 'एक कथा घडते आहे', 'काळोखातील काळोख' इ. मधून महाराष्ट्र व कर्नाटकच्या सीमावर्ती भागातील देवदासींचे चित्रण त्या परिसरातील भाषेतूनच केलेले आहे. महादेव मोरे यांच्या साहित्यातून कन्नड-मराठी भाषेतील शब्द व वाक्य स्तरावरची देवाण-घेवाण व मराठी भाषेवर त्याचा झालेला परिणाम आणि स्थानिक समाजाच्या भाषावापरशैलीची वैशिष्टये यांचा अभ्यास करता येणे शक्य आहे. तसेच देवदासींचे 'भाषिक समाज' म्हणून वेगळेपण अभ्यासता येणार आहे. या लेखकांबरोबरच आण्णा भाऊ साठे यांची 'चिखलातील कमळ' या कादंबरीत तसेच वामन होवळ यांच्या 'देव पावला-देव धावला' कथेतून ग्रामीण व शहरी समाजाचे जीवन व त्यांची भाषा आली आहे. तर चारूता सागर यांच्या 'दर्शन' या कथेतून येणारी देवदासी ही सांगली जिल्ह्याच्या पार्श्वभूमीवर तेथील भाषेसह अभिव्यक्त होते. या सर्व लेखकांनी आपल्या परिसरातील भाषेच्या माध्यमातून देवदासींचे चित्रण केले आहे. बळवंत कांब्ळे यांनी देवदासींचे जीवन जवळून अनुभवले आहे. त्यामुळे त्यांच्या लेखनातून देवदासींच्या जीवनाची अस्सलता दिसते.'जोगव्याचे दिवस','नापत' या कादंबरीतील देवदासींचे जीवन आणि भाषिक अभिव्यक्ती या दोन्ही अंगाचा स्वतंत्रपणे अभ्यास करता येईल.

देवदासींमधील ‘जोगतीण’ ‘मुरळी’ यांच्याप्रमाणेच देवीला मुली सोडण्याची प्रथा कोकण, गोवा तसेच कर्नाटक आणि कोकणालगतच्या सीमावर्ती भागात अस्तित्वात आहे. या देवदासींना कोकणात ‘भाविण’ म्हटले जाते. कोकण परिसराच्या पार्श्वभूमीवर लेखन करणा-या लेखकांनी भाविणीचे चित्रण करताना कोकणी बोली, कर्नाटक व कोकण सीमावर्ती भागातील बोली, गोवा भागातील बोलींचा वापर केलेला आहे. सातोस्कर बा.द.यांच्या ‘जाई‘, ‘मेनका’, सुभाष भेंडे यांची ‘आमचा गोंय आमका जाय’ तसेच मधु मंगेश कर्णिक, बा.भ.बोरकर, जयवंत दळवी यांच्या कादंबरीतून कोकणातील भाविणींचे चित्रण करण्यात आले आहे. या कथा-कादंबरीतून भाविणीच्या व्यथा होताना, समाजजीवनाचे चित्रण करताना लेखकांनी त्या-त्या परिसरातील भाषा वापरल्यामुळे स्थानिक भाषावापराचे नमुने उपलब्ध झालेले आहेत.

उत्तम बंडू तुपे यांच्या ‘झुलवा’, विजयकुमार दळवी यांच्या ‘जोगवा’ या कादंबरीतून तर बाबूराव बागूल, शंकरराव खरात यांच्या कथेतून आलेल्या देवदासींच्या चित्रणाचा व भाषेच्या वैशिष्टयांचा अभ्यास करता येईल.

या सर्व सामग्रीचा समाजभाषावैज्ञानिक दृष्टीने अभ्यास होणे गरजेचे आहे. समाजभाषाविज्ञानात ‘भाषिक समाज’ हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. ‘समान भाषा मानक, समान औचित्य कल्पना, समानज्ञान व श्रध्दा असणारा समाज म्हणजे भाषिक समाज’ असा एक दृष्टीकोन समाजभाषाविज्ञानात आहे. देवदासींची जीवन जगण्याची पद्धती, त्यांच्या श्रद्धा, समाजाचा देवदासींकडे पाहण्याचा दृष्टीकोन व देवदासींचा समाजाकडे पाहण्याचा दृष्टीकोन, त्यांची भाषा, औचित्य कल्पना याआधारे देवदासींच्या वर्गाला ‘भाषिक समाज’ मानता येईल. या भाषिक समाजाची भाषाव्यवहारशैली, भाषावापर, देवदासींच्याविषयी समाजाची भाषेतून व्यक्त होणारी धारणा, देवदासींचा कौटुंबिक भाषाव्यवहार, स्त्रीयांची भाषा, पुरूष भाषाव्यवहार, जोगतीण, मुरळी व भावीण यांचे प्रकारनिहाय शब्दभंडाराचे वैविध्य मराठी-कन्नड, कोकणी बोली-कन्नड या भाषांच्या संपर्कातून भाषाव्यवहारात झालेली उसनवरी, भाषासंपर्क परिणाम, त्यातून उद्भवणारी वाचासरमिसळ व वाचापालटची शक्यता, देवदासींची लघुक्षेत्रातील भाषा, देवदासी भाषिक समाजात प्रामुख्याने आढळणारे भाषाप्रदूषण (ग्राम्यता वाचक शब्दांचा वापर) इ. घटकांचा समग्रपणे अभ्यास होणे अत्यंत आवश्यक आहे.

अभ्यासाची उद्दिष्टये :

- कथात्मक साहित्याचे विशेष अभ्यासणे.
- कथात्मक साहित्यातील उपप्रकारांचे रचनाविशेष अभ्यासणे.
- भाषाविज्ञानाचे स्वरूप अभ्यासणे.
- समाजाभाषाविज्ञानाचे स्वरूप व विशेष अभ्यासणे.
- समाजाभाषाविज्ञानाच्या अभ्यासक्षेत्रांची व्याप्ती समजावून घेणे.
- 'भाषिक समाज' या संकल्पनेची व्याप्ती अभ्यासणे.
- 'देवदासी' भाषिक समाजाच्या भाषिक वैशिष्टयांचा अभ्यास करणे.
- देवदासींच्या भाषाव्यवहाराचे स्वरूप अभ्यासणे.
- परभाषासंपर्कामुळे भाषेवर होणा-या परिणामांचा शोध घेणे.
- मराठी-कन्नड, मराठी-कोकणी यांच्या संपर्कातून निर्माण होणाऱ्या भाषिक रूपांचा व वाक्यस्तरावर होणाऱ्या परिणामांचे विशेष अभ्यासणे.
- देवदासींच्या प्रकारनिहाय विशेष अभ्यासणे, जीवन जगण्याच्या, धार्मिक श्रद्धा , धार्मिक आचरण यांची मानके यांचे विशेष अभ्यासणे.
- देवदासींच्या प्रकारनिहाय भाषाभंडाराचा शोध घेवून त्याची वैशिष्टये अभ्यासणे.
- देवदासींची लघुक्षेत्रातील भाषाव्यवहाराचे विशेष व स्वरूप अभ्यासणे.
- 'धुरिणत्वाची सत्ता' या तत्त्वाच्या आधारे पुरूषभाषाव्यवहार आणि स्त्रीयांच्या भाषाव्यवहाराची चिकित्सा करणे.
- बहुभाषिकतेमुळे निर्माण होणा-या 'भाषासरमिसळ' व 'वाचापालट' यांचे विशेष अभ्यासणे.
- कथात्मक साहित्याच्या आधारे व्यक्तिबोलींचे विशेष अभ्यासणे.

अभ्यासाची गृहीतके :

संशोधन कार्य योग्य पद्धतीने पूर्णत्वास येण्यासाठी संशोधनाला योग्य दिशा मिळणे अत्यंत महत्त्वाचे असते. संशोधनाची दिशा निश्चित करण्यासाठी व निष्कर्षाप्रत पोहोचण्यासाठी संशोधन विषयासंबंधी गृहीतके समोर असणे गरजेचे असते. गृहीतके संशोधनाला दिशा तर देतातच पण शास्त्रीय पद्धतीने संशोधन करण्यासाठी गृहीतके उपयोगी पडतात. ही आवश्यकता लक्षात घेऊन प्रस्तूत शीर्षकांतर्गत संशोधन करीत असताना पुढील गृहीतके समोर ठेवण्यात आली आहेत.

- समाज आणि साहित्य यांचा अन्योन्य संबंधअसतो.
- साहित्यामध्ये समाजाच्या रूढी, परंपरा, संस्कृती, लोकव्यवहाराचे चित्रण झालेले असते.
- साहित्यिक साहित्य लिहित असताना बऱ्याचवेळा लोकभाषेचा वापर करत असतात . अशा साहित्यातून तत्कालीन भाषाव्यवहाराचे स्वरूप समजावून घेता येते.
- साहित्यात आविष्कृत झालेली भाषा ही समाजाच्या दैनंदिन भाषेतून संस्करित झालेली असल्यामुळे भाषिक समाजाच्या भाषावापरशैलीचे अनेक नमुने साहित्यकृतीतून उपलब्ध होऊ शकतात.
- दोन भाषिक समाज एकत्र आल्यानंतर जसे सांस्कृतिक आदान-प्रदान होते तसेच भाषिक आदान-प्रदान होत असते. त्यामुळे भाषिक समाजाच्या भाषावापरशैलीवर परिणाम होत असतो.
- 'ग्राम्यता वाचक' शब्द हे देखील समाजाच्या भाषिक दळणवळणाचे महत्त्वाचे अंग आहे. विशेषतः ग्रामीण भागातील समाजात भाषाप्रदुषण मोठ्या प्रमाणत आढळते
- दोन भिन्न भाषिकसमाज एकत्र आल्यानंतर वाचापालट, भाषा सरमिसळ, पिजन भाषानिर्माण होणे असे अनेक परिणाम दिसून येतात.
- लोकभाषा नियंत्रित करणारी एक व्यवस्था अदृश्य पातळीवर कार्यरत असते. समाजाचे धुरिणत्व करणारे विशिष्ट सामाजिक घटक भाषेच्या माध्यमातून सत्ता निर्माण करीत असतात, आपले सामाजिक हितसंबंध आबाधित राखण्यासाठी भाषेचा, भाषिक रूपांचा हेतुपुरस्करपणे वापर केला जातो.
- परंपरा, रूढी, चालीरीती, संस्कृती इ. चीभाषाही मुख्य वाहक असते. त्यामुळेया सर्व गोष्टी टिकून राहाव्यात याची तजवीज भाषिक समाज आपल्या भाषेच्या माध्यमातून करत असतो. अशा भाषिक रूपांचा अभ्यास करणे शक्य आहे.

अभ्यासपद्धती :

सदर विषय आंतरविद्याशाखीय असल्यामुळे आतंरविद्याशाखीय दृष्टीचा अवलंब केला जाणार आहे. भाषाविज्ञान, समाजशास्त्रीय सिद्धांताचा आधार घेतला जाणार आहे. तसेच पाठचिकित्साही उपयुक्त ठरणार आहे.

पूर्वाभ्यास :

मराठी कथात्मक साहित्याचा यापूर्वी विविध अंगांनी अभ्यास करण्याचा प्रयत्न झालेला आहे. समाजभाषावैज्ञानिक दृष्टीनेही काही अभ्यासकांनी कथात्मक साहित्याचा अभ्यास केलेला आहे. यामध्ये 'दलित कथावाङमयाचा समाजभाषावैज्ञानिक अभ्यास' सारीपुत्र तुपेरे, 'दलित नाटकांचा समाजभाषावैज्ञानिक अभ्यास' आनंदा कुंभार, 'स्त्रीयांच्या कथालेखनाचा समाजभाषावैज्ञानिक अभ्यास' नम्रता हातळणे, 'साठोत्तरी ग्रामीण कादंबरीचा समाजभाषावैज्ञानिक अभ्यास' पद्मा पाटील इ. नीं समाजभाषावैज्ञानिक दृष्टीने कथात्मक साहित्याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच 'मराठी कथात्मक साहित्यातील देवदासींचे चित्रण' या विषयावर राजे मनमोहन विश्वनाथ यांनी अभ्यास केलेला आहे. सदर संशोधकाने मराठी कथात्मक साहित्यात कथा-कादंबरीकारांनी देवदासींच्या केलेल्या चित्रणाला केंद्रस्थानी ठेवून देवदासींच्या एकूण स्थिती-गतीचे मराठी साहित्यात पडलेले प्रतिबिंब यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. अभ्यासकाने सदर संशोधनाच्या 'मराठी कथात्मक साहित्यातील देवदासी चित्रणाची अभिव्यक्ती' या प्रकरणात देवदासींच्या जीवनाचे चित्रण करणा-या कथा-कादंबरीकारांच्या निवेदनशैलीची वैशिष्टये शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे त्याचबरोबर संवादाचे स्वरूप अधोरेखित केले आहे. सदर अभ्यासकाने या प्रकरणाची मांडणी वाङमयीनदृष्टीने केली आहे, परंतु देवदासींचे चित्रण करणा-या कथात्मक साहित्याची व्याप्ती (सुमारे 25 कादंबरी 30 कथा) व कथात्मक साहित्यात सातत्याने होणारे चित्रण (सन 1931 ते आजतागायत) पाहता विस्तृत कालावकाशातील भाषेचा समग्रपणे अभ्यास करणे शक्य आहे. तसेच देवदासींचे चित्रण झालेल्या कथात्मक साहित्यातून उपलब्ध होणारे शब्दभंडाराचे वेगळेपण, भाषावापरशैलीची विशेषत: इ. चा अभ्यास होणे अत्यंत आवश्यक आहे. सदर अभ्यासातून देवदासींच्या भाषावापराचा समाजभाषावैज्ञानिकदृष्टीने अभ्यास करण्याचा हेतू आहे.

स्थूल प्रकरण रचना :

प्रकरण – 1 - समाजभाषाविज्ञान स्वरूप व सिद्धांत

प्रस्तुत प्रकरणात भाषाविज्ञानाचे स्वरूप तसेच भाषाविज्ञानाची वाटचाल व विकास यांचा आढावा घेण्यात येणार आहे. भाषाविज्ञानाच्या विविध शाखांचा स्थूल परिचय करून देण्याबरोबरच 'समाजभाषाविज्ञान' या शब्दाच्या केल्या गेलेल्या व्याख्यांचा परामर्श घेण्यात येणार आहे. समाजभाषाविज्ञान शाखेचा उदय, विकास आणि महत्वाच्या अभ्यासकांच्या मतांची चिकित्सा केली जाणार आहे. समाजभाषाविज्ञान अभ्यास पद्धतीच्या माध्यमातून भाषेच्या केल्या जाणाऱ्या अभ्यासाचे स्वरूप व पद्धती यांची सविस्तर चर्चा सदर प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण – 2 - देवदासी : प्रदेश, भाषिक समाज व भाषा

देवदासी प्रथा ही पूर्वापार चालत आलेली प्रथा आहे. या प्रथेचे अस्तित्व फक्त महाराष्ट्रापुरते मर्यादित नसून कर्नाटक, ओरिसा, गोवा, तामिळनाडू अशा अनेक राज्यात ही प्रथा प्रचलित आहे. कर्नाटकातील सौंदत्ती (जिल्हा-बेळगाव) या गावात यल्लम्मा देवीचे स्थान आहे. पौर्णिमेला तेथे यात्रा भरते. यात्रेवेळी देवीला मुली वाहिल्या जातात. ही प्रथा कर्नाटक राज्याबरोबरच महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यामध्ये अस्तित्वात आहे. विशेषतः कर्नाटक राज्याच्या सीमावर्ती भागात असणाऱ्या कोल्हापूर, सांगली, सोलापूर अशा जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात देवीला मुली वाहण्याची व त्यांना जोगतीण म्हणून सोडण्याची प्रथा चालत आलेली आहे.

महाराष्ट्रातील आणखी एक महत्त्वाचे लोकदैवत म्हणजे 'खंडोबा'. खंडोबालाही मुरळी सोडण्याची प्रथा महाराष्ट्रात पूर्वापार चालत आलेली आहे. खंडोबाला मुली सोडल्या जातातत्यांना 'मुरळी' म्हटले जाते तर मुलगा सोडला तर त्याला 'वाघ्या' म्हटले जाते. हे दोघेही देवाचे दास म्हणून त्याची व समाजाची सेवा करतात धार्मिक कार्य पार पाडतात.

जोगतीण व मुरळी बरोबरच महाराष्ट्रातील कोकण व गोवा या राज्यात भाविणीची प्रथा प्रचलित आहे. या भागातील स्थानिक देवता शांतादुर्गा, मंगेशी, नागेशी यांना मुली वाहण्याची प्रथा आहे. या मुली विवाह न करता देवीची सेवा करतात. यामराठी भाषिक प्रदेशात अस्तित्वात असणाऱ्या देवदासींचे प्रकारनिहाय प्रदेश व त्यांची वैशिष्ट्ये, देवदासींचे मानके, रिती, परंपरा, जगण्याविषयीच्या कल्पना, दैवत, आराध्ये, देवदासींचेप्रकार निहाय विशेष , इ. बाबींचा अभ्यास सदर प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण – 3 - देवदासी भाषिक समाज : भाषा संपर्काचे स्वरूप

सदर प्रकरणात देवदासींच्या भाषासंपर्काचे स्वरूप, तसेच देवदासी ज्या मराठी भाषिक समाजाच्या अंग आहेत त्या भाषिक समाजाचे विशेष हे निवडक साहित्याच्या अनुषंगाने अभ्यासण्यात येणार आहे. भाषिकसमाजाच्या विशेषांची चिकित्सा करतानाच 'व्यक्तीबोली'ही संकल्पना, व्यक्तिपरत्वे भाषेचे होणारे उपयोजन व त्यांचे विशेष निवडक कथा व कादंबरीतील पात्रांच्या माध्यमातून या प्रकरणात अभ्यासण्यात येणार आहे. शेजारभाषा संपर्क, त्याचे महत्त्व, अनिवार्यता व भाषिक स्तरावर शेजारभाषेचे होणारे परिणाम यांचा अभ्यासही या प्रकरणात करण्यात येणार आहे. कन्नड- मराठी, कोकणी- मराठी या शेजारभाषामधील संपर्क व भाषिक समाजाच्या भाषावापर शैलीवर होणारा परिणाम चिकित्सा करण्याबरोबरच परभाषासंपर्क, द्विभाषिकता, बहुभाषिकता, भाषाद्वित, भाषामिश्रण, भाषाबदल, भाषादंडक व भाषालघुत्व या भाषिक समाजाच्या भाषावापरशैलीच्या प्रवृत्तींचा अभ्यास सदर प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण – 4 - देवदासी : लघुक्षेत्रे आणि भाषा व्यवहार

'भाषिक समाज' ही व्यापक संकल्पना असून भाषिक समाजामध्ये अनेक लघुक्षेत्रांचा समावेश होतो. यामध्ये कौटुंबिक भाषाव्यवहार, समाजाचा भाषाव्यवहार, स्त्रियांचा भाषाव्यवहार इ. अनेक गोष्टींचा अंतर्भाव होतो. या सर्व लघुक्षेत्रांचे निराळेपण व विशेष निवडक कथा व कादंबरीच्या सहाय्याने या प्रकरणात अभ्यासण्यात येणार आहे. देवदासींच्या कौटुंबिक भाषा व्यवहाराचे निराळेपण महादेव मोरे यांच्या कथेतील संवादातून पहावयास मिळ्तात. देवदासीदेवीविषयी अत्यंत श्रद्धाभावाने बोलतात ते पुढीलप्रमाणे, "आता यल्लू बाईला काळजी. ती धकवून कडवंर न्हीवू दे, न्हायतर मंदीच बुडवू दे.", " जट फुटणे म्हणजे म्हणजे आई यल्लू बाईच आवंतन, बोलावणं, पोरीला जोगतीण करून तिच्या पायावर घालावं लागतं." तर उत्तम बंडू तुपे यांच्या'जग' या कथेतील आई आपल्या मुलीला जगात कसं जगावं याचं ज्ञान शिकवते ती पुढीलप्रमाणे, "राधे आता तुलाबी कळंल ---- शिकार म्हणून आख्खा जलम काढायचा नि शिकार होता होता शिकार करून जगायचं. देवीच्या दासीला असंच वागावं लागतं पोरी, दासी देवाची पर शेवा जगाची करायची असती तरचं आपल पोट भरतं." सामान्यतः शील हे काचेच्या भांड्यासारख असतं ते प्राणपणानं जपलं पाहिजे ही शिकवण आईकडून मुलीला दिली जाते. पण वरील संवादात याच्या उलट जगरहाटी आई मुलीला शिकवीत आहे, कारण देवदासीचा सामाजिक दर्जा व त्यांचे जगण्याचे साधन यामुळे शील, योनिशुचिता, चारित्र्य या संकल्पना इतर समजापेक्षा वेगळया आहेत. त्यामुळे त्यांची भाषाही निराळी असल्याचे दिसते.

या कथा-कादंबरीत येणाऱ्या स्त्रियांच्या भाषिक व्यवहाराची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे, "का रं भडव्या, माझ्या जवानीत तू कसा कुत्रा झाला हुतास.", बाबुराव बागुल यांच्या 'सूड' या कथेत जानकीला गंगू म्हणते, "येड्या डूकरिणी, ऊरावर बचकभर ऊर आलतं, तरी तुला अक्कल नाही.------ तुला कंच्या गधडीनं हे सतपन शिकावलयं, अगं भरात आलीस, सुरु कर, मजा कर." तसेच वामन होवाळ यांच्या 'देव धावला- देव पावला' या कथेतील दोन स्त्रियांमधील मधील संवाद पुढीलप्राणे, "कुसा रांड, किती ग बदललीयास ?" अशा अनेक संवादातून दिसून येते की, या स्त्रिया आपल्या भाषेमध्ये शिव्यांचा नियमित वापर करतात. सौजन्यपूर्ण भाषा वापर हा भाषा वापराचा सामाजिक दंडक या स्त्रिया अजिबात जुमानत नाहीत. अशी असंख्य उदाहरणे आढळून येतील.

पुरुषांच्या भाषावापरात वर्चस्ववादाची वृत्ती ठळकपणे दिसून येते, देवदासी असणाऱ्या स्त्री बरोबर बोलताना हा पुरुषी वर्चस्ववाद जागोजागी आढळतो तो पुढीलप्रमाणे, " घरातील बाईल दुसऱ्याला द्यायलामी नामर्द नाही" – 'वाघ्या- मुरळी', दिनकर पाटील. तर बाबुराव बागुल यांच्या 'काळोखाचे कैदी' या कथेतील देवरामचा आपल्या पूर्वाश्रमी मुरळी असणाऱ्या आईशी झालेला सवांद हा लक्षणीय आहे. या संवादात एकाचवेळी पुरुषी वर्चस्ववादी, सरंजामी व जात श्रेष्ठत्वाची मानसिकता प्रत्ययास येते. तो संवाद पुढीलप्रमाणे देवराम आपल्या आईला म्हणतो, " मी देशमुख ! एका बाजारू बाईचा, हलकट जातीच्या बाईचा, मुरळीचा मुलगा? छिनाल बाईला मुलगा नसतो. नुसता बाबा असतो." बाबुराव बागुल यांच्याच 'सूड' या दिर्घकथेतील स्त्रीला उपभोग्य वस्तू मानणारी चुरगाळून टाकू पाहणारी मानसिकता पुढीलप्रमाणे, " ये तू रडताना फार नाजूक दिसतीस. लहान पोरगी वाटतीस, त्यामुळे करण्याला मजा येती, ताकद येती." तर- 'दर्शन' या कथेतील संवाद पुढीलप्रमाणे " आगं कुठवर राहणार? पिकाला रान आलंय, पाणी होव आता, नाहीतर जाईल वाळून माळावरच्या गवतासारख." अशा अनेक वाक्यातून व संवादातून पुरुषाच्या लेखी स्त्रीही उपभोग्य वस्तू आहे याची स्पष्ट जाणीव होते. देवदासीचा सामाजिक दर्जा अधोरेखित करणारे हे भाषिक प्रयोग आहेत. असे भाषिक प्रयोग निश्चित होताना व्यक्तीवर प्रभाव पडणारे समाजमानस महत्त्वाची भूमिका बजावत असते. समाजमानस निर्माण करण्याची प्रक्रिया ही धुरिणत्व स्वीकारणाऱ्या व्यक्ती, गट, सामाजिक संस्था यांच्या माध्यमातून होत असते या सर्वाचा अभ्यास करण्यासाठी भाषाविज्ञानातील धुरीणत्वाची सत्ता या तत्त्वाचा आधार घेऊन चिकित्सा या प्रकरणात केली जाणार आहे. अशा अनेक भाषावापर नमुन्यांचा अभ्यास सदर प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण – 5 - देवदासी भाषिक समाज व भाषाभंडार

प्रत्येक भाषिक समाजाची भाषा ही वेगळी व वैशिष्ट्यपूर्ण असते. भाषेचा भाषिक भंडार निश्चित होताना सर्व इतरभाषा भाषांचे ऋण स्वीकारत असतात. ही आदान-प्रदानाची प्रक्रिया निरंतर सुरु असते. त्यामुळे भाषा प्रवाही राहते. जी भाषा अथवा भाषिक समाज स्वतःच्या भाषेला प्रवाहित ठेऊ शकत नाही, ती भाषा कालांतराने नामशेष होते. जागतिक स्तरावर अशा असंख्य भाषा मृत झालेल्या पहावयास मिळतात. देवदासींच्या जीवनाचे चित्रण करणाऱ्या कथात्मक साहित्यामध्ये उपलब्ध असलेल्या भाषिक सामग्रीच्या आधारे मराठी भाषेच्या बदलत्या स्वरूपाची चिकित्सा करताना देवदासींच्या प्रकार निहाय भाषाभांडारात झालेली वाढ, देवदासी प्रथेमुळे, देवतांच्या अनुषंगाने, आराधना पद्धतीनुसार मराठीत पडलेली भर यांचा अभ्यास करण्यात येणार आहे. उदा. जोगतीनिंच्या अनुषंगाने – जग, दर्शन, कवड्याची माळ, चौंडक, टाळ, जट, रांडवपुनव, अहेव पुनव, झुलवा, जोगता,लिंब नेसणे इ. शब्द येतात. मुरळीच्या अनुषंगाने - संबळ, तुणतुणे, दिमडी, कोटमा, लंगर, पथर, जागरण, मल्हार, म्हाळसा, बेलभंडारा, फटका भरणे, चेडा घालणे, भंडारा फेकणे. इ. शब्द येतात. भाविणीच्या अनुषंगाने नाईक, देवळी, शेसविधी, हातलावणी, चेडवी, गाऊनी, बायोनी असे अनेक शब्द येतात.या सर्व शब्दांची प्रकारनिहाय यादी या प्रकरणात करण्यात येणार आहे. त्याचबरोबर पिजनभाषा, क्रियालभाषा यांचा अभ्यास करण्यात येणार आहे. भाषाप्रदूषण या घटकात देवदासी व त्यांच्या भाषिक परिसरात येणाऱ्या व्यक्तीच्या बोलण्यात वापरण्यात येणाऱ्या शिविवाचक शब्दांचा शोध घेतला जाणार आहे. उदा. अनेक ठिकाणी रांड, सुकाळीच्या, छिनाल, जगझवी, हडळ, अशा शिव्यांच्या उल्लेख आलेला दिसून येतो. वर्गवाद आणि भाषा संबंध, उद्योगभाषा, लिंगभेदाची भाषा इ. घटकांचा संशोधन सामुग्रीच्या माध्यमातून अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण –6 - उपसंहार

अभ्यासांती हाती आलेले निष्कर्ष या प्रकरणात नोंदविले जाणार आहेत. तसेच महत्त्वाची निरीक्षणे नोंदवली जाणार आहेत. प्रबंधाच्या शेवटी साधनग्रंथ सूची, संदर्भग्रंथ सूची, मासिके, नियतकालिकांची सूची त्याचबरोबर परिशिष्टे जोडण्यात येणार आहे.

प्रस्तूत संशोधनामध्ये साधारणपणे वरीलप्रमाणे प्रकरण रचना अभिप्रेत आहे. तथापि, संशोधन करीत असताना अभ्यासाअंती वरील प्रकरणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

साधन ग्रंथसूची :

कादबंरी -

1) कर्णिक, मधु मंगेश - ‘देवकी’1962

2) काकोडकर, चंद्रकांत- ‘गोमंतका जागा हो’ 1950

3) कांबळे, बळवंत - ‘नापत’ 1984

4) कांबळे, बळवंत -‘जोगव्याचे दिवस’ - 1993

5) खानोलकर, चिंतामन - ‘त्रिशंकू’1968

6) गवस, राजन - ‘चौडक’ 1985

7) गवस, राजन - ‘भंडारभोग’- 1988

8) चव्हाण, रामनाथ - ‘भंडारा’- 1998

9) तुपे, उत्तम बंडू - ‘झुलवा ’- 1986

10) दळवी, जयवंत - ‘महानंदा’- 1970

11) दळवी, विजयकुमार - ‘जोगवा’- 1994

12) देसाई, रणजित - ‘अभोगी’- 1993

13) फडके, ना.सी.- ‘स्वप्नांचे सेतू’- 1966

14) बोरकर, बा.भ.- ‘भाविण’ - 1950

15) बोधे, व.बा.- ‘मुरळी’ 2000

16) भेंडे, सुभाष - ‘आमचे गोंय आमका जाय’- 1970

17) भेंडे, सुभाष - ‘जोगीण’- 1974

18) माडगूळकर, ग.दि.- ‘उभे धागे आडवे धागे’- 1972

19) मोरे, महादेव - ‘वर आभाळखाली धरती’- 1973

20) रेगे, आनंदा - ‘मालतीगंधा’ -1975

21) शिर्के, राम - ‘यज्ञ’ - 1988

22) साठे, आण्णा भाऊ - ‘चिखलातील कमळ’ 1974

23) साठे, शंकर भाऊ- ‘जग’- 1989

24) सातोस्कर,बा.द.- ‘जाई’ - 1961

25) सातोस्कर, बा.द.- ‘मेनका’ - 1978

कथा -

1) कर्णिक, मधु मंगेश - ‘कस्तुरी’ - ‘कोकाणी वस्ती गं ऽऽ’ - 1958

2) कांबळे, उत्तम - ‘देवाची बाई- ‘कावळे आणि माणसं’ - 1999

3) कृष्ण, दिवाकर - ‘चंदा आणि कामोदा’ - ‘महाराणी आणि इतर कथा’- 1955

4) खरात, शंकरराव - ‘आयना’ - ‘टिटवीचा फेरा’- 1963

5) खरात, शंकरराव - ‘मुरळी’- ‘गावशिव’- 1970

6) खरात, शंकरराव - ‘जोकतिण’- ‘गावशिव’- 1970

7) खोत, आप्पासाहेब - ‘भोग’- ‘गवनेर’ -1991

8) तुपे, उत्तम बंडू - ‘जग माती आणि माणसं’- 1993

9) दळवी, जयवंत - ‘देवकी’- ‘आश्रम’ -1964

10) दळवी, जयवंत - ‘रंजना’ - ‘स्वप्नरेखा’- 1982

11) दळवी, जयवंत - ‘पुरे झाले’ - ‘निराळा’ - 1984

12) देसाई, माधवी - ‘जटा’- ‘सागर’ - 1991

13) नेरूरकर, प्रभाकर - ‘आवडा’ - ‘प्रवासिनी’ - 1973

14) पाटील, दिनकर - ‘वाघ्यामुरळी’ - ‘सूर्याचं चांदणं- 1952

15) पाटील, रंगराव बापू - ‘जोगवा’ - ‘ल्हावर’- 1987

16) पाटील, बळवंत - ‘मुलाचा बाप कोण’ - ‘घुसमट’ -1998

17) प्रभूदेसाई, बाळकृष्ण - ‘शिवकळा’ - ‘गधर्व’ - 1987

18) बागूल, बाबूराव - ‘काळोखाचे कैदी’ - ‘जेव्हा मी जात चोरली होती’- 1963

19) बागूल, बाबूराव - ‘सूड’ - ‘सूड दीर्घकथा’- 1970

20) माडगूळकर, व्यकंटेश - ‘विपरित घडले नाही’ - ‘हस्ताचा पाऊस’- 1953

21) मोरे, महादेव - ‘जोगतीण’- ‘बत्ताशी’ - 1965

22) मोरे, महादेव - ‘श्वापद - ‘दवना’- 1977

23) मोरे, महादेव - ‘काळोखातील खुणा’ - ‘फर्री’ - 1984

24) मोरे, महादेव - ‘बेंडल’ - ‘बेंडल’ - 1986

25) मोरे, महादेव - ‘कथा घडते आहे’ - ‘बेंडल’ 1986

26) मोरे, महादेव - ‘काळोखातील काळोख’- 1994

27) रघुनाथ, बी - ‘मुरळी’ - 1955

28) सागर, चारूता - ‘दर्शन’ - ‘नागिण’ - 1976

29) सुखटणकर, वि.स.- ‘जाई जुई’ - ‘सहयाद्रीच्या पायथ्याशी’ - 1931

30) होवाळ, वामन - ‘देव पावला देव धावला’ - ‘बेनवाड’ - 1973

संदर्भ ग्रंथसूची :

1) कालेलकर, ना. गो.- भाषा आणि संस्कृती- 1969, मौज प्रकाशन गृह, मुंबई.
2) कालेलकर, ना. गो.- भाषा : इतिहास आणि भूगोल- 1964.
3) केळकर, अशोक रा.– मध्यमा: भाषा आणि व्यवहार, मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे.- 1966
4) गवळी, अनिल – भाषाविज्ञान आणि मराठी भाषा, हिरण्यकेशी प्रकाशन, कोल्हापूर.- 2002
5) जोशी प्रभाकर आणि गोखले चारुता (संपा)– सामाजिक भाषाविज्ञान, निराली प्रकाशन, पुणे.- 1999
6) थोरात, हरिश्चंद्र – साहित्याचे संदर्भ, मुंबई विद्यापीठ व मौज प्रकाशन, मुंबई. 2005
7) धोंडगे, रमेश – भाषा आणि भाषाविज्ञान, दिलीपराज प्रकाशन,पुणे – 2006

8) धोंडगे, रमेश –सामाजिक भाषाविज्ञान, दिलीपराज प्रकाशन, पुणे – 2006
9) नेमाडे, भालचंद्र– साहित्याची भाषा – साकेत प्रकाशन, औरंगाबाद- 1989
10) पाटणकर, जयश्री – सामाजिक भाषाविज्ञान : कक्षा आणि अभ्यास, ससंदर्भ प्रकाशन, नाशिक. – 2005
11) पाध्ये, दिगंबर– साहित्य, समाज आणि संस्कृती, लोकवाङ्मयगृह व मुंबई विद्यापीठ, मुंबई. 1998.
12) प्रियोळकर, अ. का.– ग्रांथिक मराठी भाषा आणि कोकणी बोली, पुणे विद्यापीठ, पुणे.– 1966.
13) मालशे, मिलिंद – आधुनिक भाषाविज्ञान : सिद्धांत आणि उपयोजन, लोकवाङ्मयगृह, मुंबई– 1998.
14) वरखेडे, रमेश– समाजभाषाविज्ञान प्रमुख संकल्पना, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर. -2001
15) साने, ह. श्री.– सामाजिक शास्त्रे आणि साहित्य : अंतसंबंध प्रतिमा प्रकाशन, पुणे. 1995.

संशोधक
श्री. सौरभ रमेश पाटणकर
मु.पो. : यड्राव, तालुका : शिरोळ,
जिल्हा : कोल्हापूर

मार्गदर्शक
प्रा. डॉ. राजीव वैजनाथराव यशवंते
सहा. प्राध्यापक, मराठी विभागप्रमुख,
श्री. गुरुबुद्धी स्वामी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पूर्णा.